# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
## समाजशास्त्र विभागा अंतर्गत
## लिंगभाव संवेदनशीलता विशेष व्याख्यान अहवाल

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये स्त्री-पुरुष समतेच्या मूल्यांचा विकास होण्यासाठी मंगळवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ रोजी "लिंगभाव संवेदनशीलता" या उपक्रमांतर्गत "लिंगभाव - एक सामाजिक आणि सांस्कृतिक रचित" या विषयावर मा. आनंद पवार, संचालक, सम्यक संस्था, पुणे यांच्या ऑनलाइन विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

### भूमिका

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामतीचे आदरणीय प्राचार्य डॉक्टर चंद्रशेखर मुरूमकर सर यांच्या या मार्गदर्शनाने व प्रेरणेने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय हे बारामती परिसरातील अत्यंत महत्त्वाचे महाविद्यालय म्हणून सर्वपरिचित आहे. या महाविद्यालयांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षण घेत असताना औपचारिक शिक्षणाबरोबरच जीवन मूल्यांचा विकास व्हावा म्हणून विशेषतः समतेच्या मूल्यांचा विकास व्हावा, स्त्रियांबद्दल सन्मानाची भावना निर्माण व्हावी व पालकांनाही आपल्या खऱ्या जबाबदारीची जाणीव व्हावी हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता.

### लिंगभाव संकल्पना समाजशास्त्रीय संकल्पने पलीकडे बघणे हि काळाची गरज - मा. आनंद पवार

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. आनंद पवार यांनी सहभागी उपस्थितांसमोर "लिंगभाव - एक सामाजिक आणि सांस्कृतिक रचित" या विषयावर अत्यंत मूलभूत अशी मांडणी केली. त्यांनी विद्यार्थी व उपस्थितांच्या मनामध्ये असणाऱ्या अनेक सुप्त शंकांचं अतिशय सोप्या भाषेत निरसन करण्याचा प्रयत्न केला. याचबरोबर लिंगभाव हे सामाजिक आणि सांस्कृतिक रचित कसं आहे? याविषयी भाष्य करताना त्यांनी दैनंदिन जीवनातील अनेक उदाहरणांचा दाखला दिला आणि या माध्यमातून स्त्री आणि पुरुष कसे घडविले जातात हे समजून सांगितले. याचबरोबर लिंगभाव या संकल्पनेकडे केवळ एक समाजशास्त्रीय संकल्पना एवढ्या मर्यादित अर्थाने न बघता समाजशास्त्रीय संकल्पने पलीकडे बघणे ही


TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

काळाची गरज कशी आहे हे प्रभावीपणे अधोरेखित केले. यामध्ये फायनान्स, बजेटिंग, मॅनेजमेंट इ. सारख्या विषयांमध्ये देखील लिंगभाव या संकल्पनेचा अंतर्भाव कशा पद्धतीने झालेला आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. लिंगभाव ही संकल्पना स्पष्ट करत असताना बायोलॉजिकल सेक्स किंवा शरीर शास्त्रीयदृष्ट्या मिळालेल्या लिंगाकडून समाज जी अपेक्षा करतो ते म्हणजे लिंगभाव हे देखील त्यांनी अनेक दैनंदिन जीवनातील घटनांचा दाखला देत स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर लिंगभाव ही स्थळ, काळ आणि प्रादेशिक गोष्ट कशी आहे हे देखील अनेक उदाहरणांच्या आधारे पटवून देण्याचा प्रयत्न केला, आनंद पवार यांनी सदर व्याख्यान अधिकाधिक संवादी पद्धतीने करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असणाऱ्या अनेक प्रश्नांना त्यांनी यावेळी उत्तरे दिली. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असणाऱ्या या गोष्टी समजून घेत त्याचा संदर्भासहित उलगडा करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.


अध्यक्षीय मनोगतामध्ये मा. प्राचार्य यांनी लिंगभाव आणि स्त्री-पुरुष समता याविषयी समकालीन वास्तवाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला. आढावा घेत असताना ते असे म्हणाले की, जेंडर इक्विटी हे केवळ पुरोगामी असण्याची फॅशन म्हणून सध्या मोठ्या प्रमाणावरती वापरली जात आहे. याबरोबरच ते असेही म्हणाले की, काळाच्या संदर्भाने वेळेच्या अनुषंगाने लिंगभाव हीच संकल्पना अभ्यासणे खूप गरजेचे आहे. याबरोबरच त्यांनी असेही अधोरेखित केले की, सोशल आणि कल्चरल कन्स्ट्रक्ट या गोष्टीवर देखील इथल्या सत्ताधारी व्यवस्थेचं मोठं दडपण आहे. याबरोबरच भांडवलशाही व्यवस्थेने देखील लिंगभेदाचा आणि लिंगभावाचा वापर करत आपल्या बाजार व्यवस्थेचं मोठ्या प्रमाणावर विस्तारीकरण केल आहे. सध्याच्या काळात आजूबाजूची परिस्थिती जर आपण बघितली तर असं दिसतं की समाज माध्यमांचं व्यक्तीवर नियंत्रण हे मोठ्या प्रमाणावर ती वाढलेलं आहे. प्रत्येक व्यक्तीला सुंदर दिसण्याचं दडपण आणि ताण सहन करावा लागत आहे आणि या दडपणातूनच मोठ्या प्रमाणावरती कौटुंबिक हिंसाचारामध्ये वाढ झालेली आहे.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय सामाजशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. विनायक लष्कर यांनी केले. तर सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे स्वागत प्रा. नितीन चव्हाण यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार मा. अभिनंदन शहा सरांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. त्याचबरोबर महाविद्यालयातील सर्व शाखांचे उपप्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE
BARAMATI
413 102
★ PUNE ★




TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI




TULJARAM CHATURCHAND COLLEGE
BARAMATI